④


**महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**

**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


आरोग्य सेवा
परिपत्रक क्रं ४ महत्वाचे

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/अधिसूचना/ 1151-11223/१६
दिनांक :- २३/०९/२०१६

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू
जिल्हा परिषद,........(सर्व)

२) आरोग्यधिकारी,तथा निबंधक जन्म-मृत्यू
महानगर पालिका............(सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई.

विषय :- महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम (पहिली सुधारणा)२०१६
महाराष्ट्र शासन अधिसूचना राजपत्र (भाग ४ - अ) दिनांक १४ जुलै २०१६

संदर्भ :- १) अवर सचिव,सार्वजनिक विभाग,मत्रालय,मुंबई
यांचे पत्र क्रं.जमृनों-२०१२/प्र.क्र.५०९/कुं.क दि १६/०८/२०१६.
२) उपमहानिबंधक भारत सरकार यांचे पत्र क्रं १/०७/२०११/व्ही एस (सीआरएस) दिनांक १६/०४/२०१२
३) उपमहानिबंधक भारत सरकार यांचे पत्र क्रं १/०७/२०११/व्ही एस (सीआरएस) दिनांक २०/०५/२०१३
४) उपमहानिबंधक भारत सरकार यांचे पत्र क्रं ०१/१२/२०१४/व्ही एस (सीआरएस)३६९८ दिनांक २८/०१०/२०१४
५) उपमहानिबंधक भारत सरकार यांचे पत्र क्रं ०१/०७/२०१४/व्ही एस (सीआरएस)(पार्ट)२११ दिनांक १६/१२/२०१६

केंद्र शासनाने जन्म मृत्यू नोंदणीसाठी विहीत केलेल्या नमुन्यात खालील बाबीचा समावेश केलेला आहे.त्यानूसार केंद्र शासनाने crsorgi.gov.in या संकणक प्रणालीमध्ये यथोचीत बदल केलेला आहे.

१) दत्तक बालकासाठी जन्म नोंदणीचा नमुना क्रं १ अ चा समावेश
२) मृत्यू नोंदणी मध्ये पती/पत्नी (जोडीदार )यांच्या नावाचा समावेश
३) जन्म-मृत्यू नोंदणी मध्ये आधार क्रंमाकाचा समावेश
४) जन्म मृत्यू नोंदणी करताना लिंग या रकान्यात " पुरुष किंवा स्त्री "ऐवजी " पुरुष किंवा स्त्री किंवा तृतीय लिंगी"यांचा वापर करणे.

वर नमुद केलेली माहिती प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील विहीत नमूने( १,१अ,२,३,५व ६) मध्ये याबाबी समावेश करुन महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ जुलै २०१६ अन्वये, अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेची प्रत आपल्या माहिती पुढील कार्यवाहीसाठी जोडण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील सर्व निबंधकाना अधिसूचनेबाबत अवगत करावे, तसेच शहरी भागातील निबंधक जन्म-मृत्यू महानगरपालिका /नगरपालिका/नगरपंचायत /कंटक मंडळे/ऑर्डीनन्स फॅकटरी यांनी या अधिसूचनेसोबत जोडलेल्या सुधारीत नमुन्यात छापून घेवून याचा न चुकता वापर करण्याच्या देखील सूचना आपले स्तरावरुन निर्गमित कराव्यात व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी

उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत माहितीस्तव सादर

१) मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग (कु.क)जी.टी.रुग्णालय आवार मंत्रालय मुंबई.
२) मा.प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई.
३) मा. प्रधान सचिव,नगरविकास विभाग ,मंत्रालय मुंबई.
४) मा.संचालक, नगर पालिका प्रशासन,वरळी मुंबई.
५) मा.संचालक आरोग्य सेवा,तथा मुख्य निबंधक,जन्म मृत्यू आरोग्य सेवा,संचालनालय मुंबई.
६) उपसंचालक आरोग्य सेवा,परिमंडळे ................(सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ)
पुणे
दिनांक
जावक क्र. 11151-11224
सही